# How and when did you become a poet?

by Narendra Modi 9. October 2009 11:47

विशालकाय
दगडांच्या गर्भातून
केव्हा निघाला हा झरा झर झर
डोंगरांना त्याची काय खबर?

करूणा धारण करे
शब्दांचा देह
संवेदनेचा
सुगंध पसरे

करूणा, वेदना, संवेदनेचे
भावविश्व जेव्हा
भावनेच्या सरोवरात
डहुळते

कागदाच्या नावेवर
शब्द अश्रू बनून
झोके घेतात आणि
हळूचकन कवितेचा
गर्भ अंकुरतो

कवितेचा कोंब
कसा फुटला
किंवा
प्रसववेदना कवितेची
किती दीर्घ होती
किती तीव्र होती
याचा थांग लावणे
शक्य नाही

असंख्य कविता
अवतरित होतात
पण बोटांवर
मोजता येतील
इतक्या कविताच
लेखणीतून जन्म घेतात

Copyright © 2009 NarendraModi.com

मित्रांनो,
मी कवी नाही.
मी केवळ कविता प्रेमी आहे.
शब्द साधनेचा, उपासनेचा
आनंद शोधत रहातो.

Copyright © 2009 NarendraModi.com